महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३४ वा दिनांक : २३/१०/२०२४ वार : बुधवार

## ऐन दिवाळीत अनिल देशमुखांचा डायरी बॉम्ब



**नागपूर :** माझ्या विरुद्ध कारस्थान रचून मला खोट्या आरोपामध्ये 14 महिने तुरुंगात ठेवण्यात आले. न्यायालयीन लढाई लढून मी तुरुंगाच्या बाहेर आलो. मी तुरुंगात असतांना माझ्या विरुध्द कसे कारस्थान रचण्यात आले यावर पुस्तक लिहिले. तुरुंगात असतांना अनेक वृत्तपत्रांची कात्रणे व अनेक संदर्भ गोळा केले. तुरुंगातून बाहेर आल्यावर या पुस्तकाला अंतीम स्वरुप दिले असून हे पुस्तक मराठी, हिंदी व इंग्रजीमध्ये छापण्यात आले आहे. लवकरच मी लिहिलेल्या "डायरी ऑफ होम मिनिस्टर" या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार असल्याची माहिती माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिली.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असतांना मी गृहमंत्री होतो. माझ्यावर खोटे आरोप करुन मला तुरुंगात टाकण्यात आले. तब्बल 14 महिने एका खोट्या आरोपात मी तुरुंगात होतो. माझ्या विरोधात कोणी व कसे कारस्थान रचले व माझ्या माध्यमातून महाविकास आघाडीचे सरकार पाडण्यासाठी कसा प्रयत्न झाला, मला व माझ्या परिवाराला कसा त्रास देण्यात आला, हे जाणून घेण्याची उत्सुकता महाराष्ट्रातील जनतेला आहे. मी तुरुंगात असतांना हे पुस्तक लिहण्यास सुरुवात केली. उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वात काम करीत असलेले महाविकास आघाडीचे सरकार पाडण्याचे कसे व कोणाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आले याची संपूर्ण माहिती या पुस्तकात देण्यात आली असल्याचेही अनिल देशमुख यांनी सांगितले.

मी मधल्या काळात या बद्दल काही गोष्टींचा खुलासा केला होता. तेव्हा अनेकांनी मला प्रश्न विचारला की तुम्ही या गोष्टींचा खुलासा आताच का करीत आहात, पहिले का नाही केलात. तुरुगात लिहीलेल्या पुस्तकाला मी बाहेर आल्यावर अंतिम रुप देण्यासाठी वेळ लागला. खरतर मी पुस्तकाच्या माध्यमातूनच हे सर्व खुलासे करणार होतो. परंतु काही चुकीची माहिती ही जनतेसमोर येत असल्यामुळे काही खुलासे करावे लागले. मी लिहिलेल्या पुस्तकातून माझ्या विरुध्द रचण्यात आलेले कारस्थान, माझ्या माध्यमातून महाविकास आघाडीचे सरकार पाडण्यासाठी कसे प्रयत्न करण्यात आले या संपूर्ण कारस्थना बद्दलची माहीती लवकरच मी लिहिलेल्या "डायरी ऑफ होम मिनिस्टर" या पुस्तकाच्या माध्यमातून समोर येणार असल्याचेही अनिल देशमुख यांनी यावेळी सांगितले.

## महाविकास आघाडीतील वाद निवळला



**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांमध्ये जागावाटपाची तयारी अंतिम टप्प्यात आली असल्याचे दिसत आहे. महाविकास आघाडीमध्ये देखील काही जागांवरून तिढा असून तो देखील आता निवळला असल्याचे दिसत आहे. कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी मातोश्रीवर जाऊन शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाल्याचे समजत आहे.

महाविकास आघाडीमध्ये कॉंग्रेस १०० ते १०५ जागांवर, शिवसेना ९६ ते १०० जागांवर, तर शरद पवारांचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष ८० ते ८५ जागांवर निवडणूक लढवणार असल्याचे समजते. तसेच मुंबईमधील बहुतांश भागांवर शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार असणार असल्याची माहिती समोर येत आहे. महाविकास आघाडीचा हा फॉर्म्युला लोकसभा निवडणुकीत मिळवलेल्या विजयावर आधारित असल्याचे सांगण्यात येत आहे.

कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या मध्यस्थीनंतर शिवसेना ठाकरे गट व कॉंग्रेस पक्षातील वाद मिटला असल्याचे दिसत आहे. मुंबईमध्ये शिवसेनेलाच जास्त जागा देण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. शिवसेना ठाकरे गटाला १८ जागा, कॉंग्रेसला १४ जागा तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाला केवळ २ जागा मिळणार असल्याचे समजते. दरम्यान, महाविकास आघाडीमधील जागावाटपावर आजच्या बैठकीनंतर शंभर टक्के तोडगा निघणार असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, जागावाटपावर प्रतिक्रिया देताना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, जागा वाटपावरून महाविकास आघाडीमध्ये मतभेद नाहीत, तिकडे महायुतीमध्ये तर जागेसाठी एकमेकांचे कपडे फाडणे सुरू आहे. तसेच महाविकास आघाडीमधील जागावाटपाचा तिढा सुटेल, अशी माहिती नाना पटोले यांनी दिली आहे.

## जे.ई.एस. महाविद्यालयात कम्युनिकेशन एक्सलन्स कार्यक्रम साजरा




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जे.ई.एस. महाविद्यालय, जालना येथे इंग्रजी विभागातर्फे इंग्लिश क्लबच्या वतीने दिनांक १८ सप्टेंबर २०२४ रोजी "कम्युनिकेशन एक्सलन्स" कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती अपर्णा शंकर मॅडम (फ्रीलान्स सॉफ्ट स्किल ट्रेनर) उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. तसेच इंग्लिश क्लबच्या वतीने विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अग्निहोत्री होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापिका भाग्यश्री बियाणी यांनी केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी साहित्यविषयक विविध उपक्रमांची प्रदर्शन देखील साकारली होती, ज्याचे प्राचार्यांनी विशेष कौतुक केले.

प्राध्यापक एम. आर. महेर, डॉ. जी. एस. देशमुख, डॉ. व्ही. टी. डोईफोडे, डॉ. डी. बी. लहाडे हे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## महायुतीमध्ये जागेवरून एकमेकांचे कपडे फाडणे सुरू - नाना पटोले

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची जागावाटपाची महत्त्वाची बैठक ग्रँड हयात हॉटेलमध्ये पार पडणार आहे. तत्पूर्वी कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जागावाटपाचे सर्व दृश्य आजच समोर येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

नाना पटोले जागा वाटपावर असलेल्या मतभेदावर म्हणाले, जागा वाटपावरून महाविकास आघाडीमध्ये मतभेद नाहीत, तिकडे महायुतीमध्ये तर जागेसाठी एकमेकांचे कपडे फाडणे सुरू आहे. यावेळी बोलताना नाना पटोले म्हणाले, वाझे हा भाजपचा माणूस आहे. खोटे आरोप करून अनिल देशमुख यांना फसवण्यात आले असल्याचा आरोप देखील नाना पटोले यांनी केला आहे.

दरम्यान, सोमवारी दिल्ली येथे कॉंग्रेस पक्षाची महत्त्वाची बैठक देखील पार पडली असून त्यात कॉंग्रेस पक्षाची ९६ जागांवरची चर्चा पूर्ण झाल्याची माहिती देखील नाना पटोले यांनी दिली होती. तसेच मंगळवारी दिनांक २२ ऑक्टोबर रोजी ग्रँड हयात या हॉटेलमध्ये महाविकास आघाडीची जागावाटपावर महत्त्वाची बैठक होणार असून, या बैठकीत महाविकास आघाडीमध्ये असलेला जागावाटपाचा तिढा सुटणार असल्याचे संकेत नाना पटोले यांनी दिले आहेत.

दरम्यान दिल्ली येथील बैठकीनंतर नाना पटोले यांनी भाजपवर देखील टीका केली होती. नाना पटोले म्हणाले, भाजपाचे हिंदू प्रेम नकली आहे, नरेंद्र मोदी सत्तेत आले आणि स्वयंभू विश्वगुरु असा प्रचार करण्यात आला. या ११ वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाली त्यात जास्त हिंदूच होते. बेरोजगाराला कंटाळून तरुणांच्या आत्महत्या झाल्या त्यातही जास्त हिंदूच आहेत.

भाजपाची सत्ता आली की हिंदूवर अन्याय केला जातो हे लपून राहिले नाही. भाजपाचे हिंदुत्व हे केवळ राजकारणासाठी आहे. छत्रपती संभाजीनगर असे नामकरण केले असे जाहीरपणे सांगायचे व उमेदवारांच्या यादीत औरंगाबाद लिहायचे ही दुतोंडी भूमिका आहे. कॉंग्रेस पक्षाची सर्वधर्म समभावाची स्पष्ट भूमिका आहे, असे नाना पटोले म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ ऑक्टोबर २०२४


## शेतकरी कामगार पक्षाचे चार उमेदवार जाहीर



**रायगड :** महाराष्ट्रात विधानपरिषद निवडणुका तोंडावर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाने उमेदवारांची नावे घोषित केली आहेत. रायगड येथे मेळावा आयोजित करण्यात आला होता, यावेळी पक्षाचे नेते व सरचिटणीस जयंत पाटील यांनी चार उमेदवारांची नावे घोषित केली आहेत. जयंत पाटील यांनी पेण सुधागड, उरण, पनवेल आणि अलिबाग या चार मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार जाहीर केले आहेत.

रायगड येथील अलिबागच्या शेतकरी भवन परिसरात शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी महिलांचा देखील मोठ्या संख्येने सहभाग नोंदवण्यात आला आहे. या कार्यक्रमात चित्रलेखा पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, अतुल म्हात्रे आणि प्रीतम म्हात्रे उपस्थित होते.

या सभेत उमेदवारांची नावे जाहीर करण्यापूर्वी जयंत पाटील काहीसे भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. पेण येथून अतुल म्हात्रे, पनवेल येथून माजी आमदार बाळाराम पाटील, उरण येथून प्रीतम म्हात्रे, तर अलिबाग येथून शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या उमेदवारांच्या नावांची घोषणा करताना या सर्व जागा इंडिया आघाडीमधूनच लढणार असल्याचे देखील जयंत पाटलांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. त्यामुळे महाविकास आघाडीत शेतकरी कामगार पक्षाच्या वाट्याला किती जागा येणार याकडे देखील लक्ष असणार आहे. महाविकास आघाडीची महत्त्वाची बैठक ग्रँड हयात हॉटेलमध्ये पार पडत असून, बैठकीनंतर जागांचा तिढा सुटण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे.

## पिंपरीत अजित पवारांनी आमदाराचे तिकीट कापले

**पुणे :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्षांकडून आता उमेदवार जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यात भाजपने पहिली यादी जाहीर करत ९९ जागांवर उमेदवार घोषित केले आहेत. तसेच महायुतीमधील अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मात्र विद्यमान आमदाराचे तिकीट कापल्याचे समोर आले आहे.

अजित पवारांनी अनेक उमेदवारांना एबी फॉर्म दिले, मात्र पिंपरी येथील विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांना मात्र एबी फॉर्म देण्यात आला नाही. याचे कारण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नवनियुक्त शहराध्यक्ष योगेश बेहल यांनी सांगितले आहे. नवीन चेहऱ्याला संधी देण्यात यावी अशी मागणी पक्षातून केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच योगेश बेहल यांना शिंदे गटातील जितेंद्र ननावरे यांच्यासाठी फिल्डिंग लावायची असल्याने त्यांनी बनसोडे यांना विरोध केला असल्याचे बोलले जात आहे.

**काय म्हणाले योगेश बेहल?** योगेश बेहल म्हणाले, महायुतीमधील सर्व उमेदवार कसे निवडून येतील याकडे आम्ही पाहणार आहोत. पिंपरीमध्ये जो कोणी उमेदवार असेल किंवा अण्णा बनसोडे असतील किंवा अजून कोणी नवीन उमेदवार दिला जाईल त्याला निवडून देणे ही आमची जबाबदारी असणार आहे. पुढे बोलताना योगेश बेहल म्हणाले, पक्षातून अण्णा बनसोडे यांना विरोध आहे असे मला दिसत नाही, परंतु काही छोट्या कारणावरून नाराजी आहे, नाही असे नाही, पण ती नाराजी दूर करता येईल, असे योगेश बेहल म्हणाले.

पुढे बोलताना योगेश बेहल म्हणाले, अण्णा बनसोडे यांना उमेदवारी देण्यावर देखील काही हरकत नाही किंवा पक्षाला नवा चेहरा द्यायचा असेल तरी देखील काही हरकत नाही. मी कोणासाठी फिल्डिंग लावत नाही. पक्षातील इच्छुक उमेदवारांची माहिती पक्षाला दिली आहे, जे नेते इच्छुक आहेत, त्यापैकी कोणालाही उमेदवारी दिली तरी आम्ही त्यांच्यासाठी काम करू, इच्छुकांमध्ये आण्णा बनसोडे, जितेंद्र ननवरे, सीमा सावळे, काळूराम पवार ही नावे चर्चेत आहेत. यांच्यापैकी कोणालाही पक्षांने उमेदवारी दिली तरी आम्ही जोमाने त्यांची कामे करू, असे आश्वासन योगेश बेहल यांनी दिले आहे.

## बडतर्फ पोलिस अधिकारी सचिन वाझे यांना जामीन

**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांच्याशी संबंधित कथित भ्रष्टाचाराप्रकरणी गुन्हा दाखल झालेले वादग्रस्त पोलिस अधिकारी सचिन वाझे यांना अखेर मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. ते मागील २ वर्षांपासून तुरुंगात होते. पण आता ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांचा तुरुंगाबाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सचिन वाझे यांना मनसूख हिरेन हत्याकांड व उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या दक्षिण मुंबईतील निवासस्थानालगत स्फोटकांनी भरलेली कार पार्क केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. त्यानंतर मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंह यांनी महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर महानगरातील रेस्टॉरंट व बारमधून दरमहा १०० कोटी रुपये गोळा करण्याचे टार्गेट दिल्याचा आरोप केला होता. या प्रकरणातही सचिन वाझे यांचे नाव आले होते. तेव्हापासून ते तुरुंगात होते.

सचिन वाझे यांनी नियमित जामिनासाठी काही महिन्यांपूर्वी उच्च न्यायालयात अर्ज केला होता. त्यात त्यांनी या प्रकरणातील अनिल देशमुखांसह इतर सर्वच आरोपींना जामीन मंजूर झाल्याची बाब कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली होती. कोर्टाने त्यांचा हा युक्तिवाद मान्य करत त्यांना जामीन मंजूर केला.

## महाविकास आघाडी २४ तासांत फुटेल - शिंदे गटाच्या नेत्याचा दावा

**मुंबई :** काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची महाविकास आघाडी अवघ्या २४ तासांत फुटेल, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी केला आहे. ठाकरे गटाचे काँग्रेस व शरद पवार गटासोबत तीव्र मतभेद निर्माण झालेत. त्यामुळे महाविकास आघाडी पुढील काही तासांतच फुटल्याचे स्पष्ट होईल, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ माजली आहे.

राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत. त्यातच जागावाटपाच्या मुद्यावरून सत्ताधारी महायुती व विरोधी बाकावरील महाविकास आघाडीत गरमागरम चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर रामदास कदम यांनी उपरोक्त दावा केला आहे. रामदास कदम म्हणाले की, उद्धव ठाकरे यांची शिवसेना व शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रचंड मतभेद वाढलेत. त्यामुळे महाविकास आघाडी फुटल्याचे वृत्त पुढील काही तासांमध्येच महाराष्ट्राच्या पुढे येईल. उद्धव ठाकरे हे पक्षप्रमुख असल्याचा आव आणतात. पण ते खरे पक्षप्रमुख असते तर ते शरद पवारांच्या मांडीवर बसले नसते.

शरद पवार ठाकरे, पटोलेंना संपवतील

उद्धव ठाकरे स्वतः गुडघ्याला मुख्यमंत्रीपदाचे बाशिंग बांधून बसलेत. याशिवाय काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे सुद्धा गुडघ्याला मुख्यमंत्रीपदाचे बाशिंग बांधून बसलेत. पण शरद पवार अशी काही गुगली टाकतील की, हे दोन्ही नेते संपतील. शरद पवार यांचे यासंबंधीचे राजकारण संपूर्ण जगाला ठावूक आहे. त्याचा अनुभव पुढील २४ तासांत महाराष्ट्राला येईल. त्यानुसार उद्धव ठाकरेंची शिवसेना महाविकास आघाडीतून बाजूला झालेली असेल, असे कदम म्हणाले.

महाविकास आघाडीत काही जागांवरून मतभेद

उल्लेखनीय बाब म्हणजे महाविकास आघाडीमध्ये काही जागांवरून कमालीचे मतभेद निर्माण झाल्याचे वृत्त आहे. विशेषतः ठाकरे गटाने विदर्भातील काही जागांवर दावा केल्यामुळे त्यांचे दोन्ही काँग्रेसशी बिनसल्याचे वृत्त आहे. या पार्श्वभूमीवर रामदास कदम यांनी हा दावा केल्यामुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ माजली आहे.

दुसरीकडे, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी आज दिवसभर महाविकास आघाडीतील मित्रपक्षांच्या नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्या. त्यानंतर सायंकाळी महाविकास आघाडीचे नेते एकत्र बसून जागावाटपावर तोडगा काढण्याची शक्यता आहे. त्यात जागावाटपावर अंतिम शिक्कामोर्तब होऊन उमेदवार घोषित होण्याची शक्यता आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ ऑक्टोबर २०२४

## "यहाँ के हम सिकंदर" या दिव्यांगमहोत्सवात २६० विद्यार्थ्यांनी नृत्य व नाटिकेचे सादरीकरण केले.












**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची संलग्न संस्था बालरंगभूमी परिषद मुंबईच्या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी तापडिया नाट्यगृहात " " यहाँ के हम सिकंदर " हा दिव्यांग बालकांसाठीचा नाटय, नृत्याचा कार्यक्रम संपन्न झाला. एकूण 17 दिव्यांग संस्थांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे छत्रपती संभाजीनगर सहित धर्माबाद व वाशिम येथील दिव्यांग संस्थांनी सहभाग घेतला. एकापेक्षा एक सरस असे कला सादरीकरण करत सर्वसामान्य मुलांपेक्षा हम भी कुछ कम नही असं सांगत यहाँ के हम सिकंदर या शीर्षकास साजेसे सादरीकरण केले. कार्यक्रम महोत्सवाचे उद्धाटन बालरंगभूमी परिषद मुंबईच्या अध्यक्षा एडव्होकेट निलम शिर्के- सामंत यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी मध्यवर्ती शाखेचे कार्याध्यक्ष राजीव तुलालवार, कोषाध्यक्ष नंदकिशोर जुवेकर, सहकार्यवाह आसेफ शेख (अन्सारी) उपस्थित होते. तसेच छत्रपती संभाजीनगर शाखेचे भाग्यरवी कुलकर्णी, गोकुळ गायकवाड, वाल्मीक जाधव , प्रा.असलम शेख , लक्ष्मण अहिरे, श्रीपाद पदे, प्रतिभा रगडे यांची उपस्थिती होती. यावेळी एडव्होकेट निलम शिर्के- सामंत यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी बालरंगभूमी परिषद करत असलेले कार्य यावर मार्गदर्शन करून दिव्यांगांसाठी विशेष उपक्रम राबवता आला व त्यांच्या चेहऱ्यावर या निमित्ताने क्षणभर का होईना हास्य फुलवता आले याचे समाधान व्यक्त केले व यापुढे देखील सर्व रसिक प्रेक्षकांच्या सूचनांचे स्वागत करून येत्या काळातही बालरंगभूमी परिषद विविध उपक्रम राबवणार असल्याचे सांगितले. सादरीकरणासाठी उत्साह, रंगमंचावर सादरीकरणासाठी प्रत्येकात असलेली उत्कंठा, काहीशी भीती मनात ठेवून प्रत्येक कलावंताने "यहाँ के हम सिकंदर " म्हणत कार्यक्रमाचा रसिकां बरोबरच स्वतः देखील आस्वाद घेतला हे विशेष.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालरंगभूमी परिषदेचे रमेश सोळुंके, विनोद आघाव, राहुल रगडे, पांडुरंग शिंगारे, संतोष शेटे, अजय पहुरकर, संतोष गौतम, सुमित लहाने, संदीप साखरे , यांनी परिश्रम घेतले तर दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत भातलोंढे यांनी केले तर आभार प्रदर्शन आसिफ अन्सारी (शेख) यांनी मानले.













# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ ऑक्टोबर २०२४


## संतोष खेळवणे यांची मनसे शेतकरी संघटना जिल्हा उपाध्यक्षपदी निवड



**कन्नड (अक्षय चव्हाण) :** कन्नड तालुक्यातील जवळी येथील युवा प्रगतीशील शेतकरी मा. संतोष खेळवणे पाटील यांची महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी संघटना छ. संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार मनसे नेते बाळा नांदगावकर, दिलीप बापू धोत्रे, सरचिटणीस संतोष नागरगोजे, जिल्हाध्यक्ष वैभवजी मिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कन्नड तालुक्यातील शेतकरी संघटना अधिक मजबूत करण्यासाठी नियुक्ती केली. या निवडीचे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. बाबासाहेब थेटे, जिल्हा सचिव गौतम अण्णा शिरसाट, तालुका अध्यक्ष अनिल शेळके पाटील, शहराध्यक्ष शशांक महादने, तालुका संघटक शंकरभाऊ मतसागर, जिल्हा चिटणीस विकास बागुल, तालुका सचिव गोपालसिंग राजपूत, अशोक पवार, राहुल निकम, संतोष सोनवणे, शैलेश राऊत, अमर राठोड, संदीप देवरे, संदीप शेट्टी, योगेश पवार आदींनी अभिनंदन केले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## घड्याळ निशाणीच्या जागी दुसरे चिन्ह देण्याची शरद पवार गटाची याचिका फेटाळली



**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा दिलासा दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने एका याचिकेद्वारे राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यात आलेले घड्याळ हे चिन्ह गोठवून त्या जागी दुसरे चिन्ह देण्याची मागणी केली होती. पण सुप्रीम कोर्टाने त्यांची ही मागणी धुडकावून लावली. यामुळे विधानसभा निवडणुकीच्या ऐन धामधुमीत अजित पवार व त्यांच्या सहकाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका जाहीर होण्या आधीच आमदार अपात्र प्रकरणाचा निकाल न्यायालयाने द्यावा, अशी मागणी उद्धव ठाकरे तथा शरद पवार गटाच्या वतीने करण्यात आली होती. मात्र आता आचारसंहिता लागल्यामुळे या बाबत शरद पवार गट अधिक आक्रमक झाला होता. निवडणुका जाहीर झाल्या तरी अद्याप या प्रकरणाचा निकाल समोर आला नव्हता. या प्रकरणाचा निकाल आता आला आहे. यात अजित पवारांना मोठा दिलासा मिळाला असून शरद पवार गटाची याचिका फेटाळण्यात आली आहे.

सप्टेंबर महिन्यामध्ये हे प्रकरण तब्बल आठ वेळा सूचीबद्ध करण्यात आले होते. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात देखील हे प्रकरण तीन वेळा सूचीबद्ध करण्यात आले होते. मात्र यातील एकाही वेळी या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नव्हती. गेल्या काही महिन्यांमध्ये या प्रकरणाला तारीख पे तारीख मिळत होती. त्यामुळे विरोधकांच्या वतीने न्यायालयावर देखील टीका करण्यात येत होती. मात्र, आता या प्रकरणात न्यायालयाने निर्णय दिला आहे.

मागच्या सुनावणीत काय झाले...

२५ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीत शरद पवारांच्या वकिलांनी दावा केला होता की अजित पवार यांनी शरद पवारांना आपले दैवत म्हटले होते आणि ते सर्व एकत्र असल्याचे म्हटले होते. अजित पवार गटने न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशाचे पालन केले नाही, त्यामुळे न्यायालयाने अजित पवार गटाला विधानसभा निवडणुकीसाठी नवीन निवडणूक चिन्हासाठी अर्ज करण्याचे निर्देश द्यावेत, असे वकील म्हणाले होते.

शरद पवार गटाने निवडणूक आयोगाच्या ६ फेब्रुवारीच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती, ज्यामध्ये अजित पवार गटाला खरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (एनसीपी) आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह 'घड्याळ' म्हणून मान्यता देण्यात आली होती. वाटप केले होते.

निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अजित पवार गटाला राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यांचे निवडणूक चिन्ह 'घड्याळ' वापरण्यापासून रोखता यावे, यासाठी शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयाकडे हस्तक्षेप करण्याची मागणी केली होती. ही मागणी आता न्यायालयाने फेटाळली आहे.


Om Shanti Bahuuddeshiya Shikshan Sanstha's
GURU MISHRI AYURVED COLLEGE
Matoshri Badambai Motilalji Desarda Ayurved Hospital
BAMS 60 Seats College Code 3393

Preference Filling Started for CAP Round 2!

Shape Your Future in Medical Education

Guru Mishri Homoeopathic (4346) College Code
BHMS 100 Seats MD(Hom) 51 Seats PHD 18 Seats

Guru Mishri Pharmacy College (2642) DTE Code
D-Pharmacy 60 Seats



- Dr. Desarda's Families 43 years Experience in Medical education
- Hostel: Boy's & Girls with in campus Mess facilities & 24 Hrs round clock security
- Well established Hospital for Hands-on Training
- Easily Accessible Campus
- Result: One of the best in Maharashtra.

Approved by NCISM Delhi, Government of Maharashtra and Affiliated to MUHS,Nashik

CALL US NOW!
+91 98237 28282
+91 98340 45126

www.gurumishriamc.in www.gurumishrihmc.edu.in
Shelgaon, Tq. Badnapur, Dist. Jalna 431 202 (M.S)